



# महाराष्ट्र शासन

माहितीचा अधिकार

## ठाणे बांधकाम विभाग, ठाणे.

# THANE

## CITIZENS CHARTER - 2012

## नागरिकांची सनद - २०१२

# सुची


| अ. क्र. | तपशिल | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | प्रस्तावना | २ ते ५ |
| २. | ठाणे बांधकाम विभाग कार्यालयाची बांधिलकी व नागरिकांची जबाबदारी | ६ ते ७ |
| ३. | विभागीय कार्यालयाची रचना | ८ ते १० |
| ४. | विभागीय कार्यालयाचे कार्यक्षेत्र | ११ ते १२ |
| ५. | विभागीय कार्यालया अंतर्गत कार्यपूर्तीचे वेळापत्रक, माहितीची सुलभता व खाजगीकरण | १३ ते १४ |
| ६. | विभागीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील रस्ते सुरक्षितता | १५ |
| ७. | गा-हाण्यांचे निराकरण, सनदेचा आढावा व जनसामान्यांची छाननी | १६ ते १७ |
| ८. | सनदेची अंमलबजावणी व प्रतिसाद | १८ |
| ९. | परिशिष्ठ अ, ब, क, ड , इ | १९ ते ३१ |

## **१. प्रस्तावना**

मुंबई ही महाराष्ट्राची आर्थिक राजधानी असून ठाणे जिल्हा या नगरीशी जोडून असल्यामूळे, भौगोलिकदृष्ट्या त्यास अनन्य साधारण महत्व आहे. अशा प्रगत नगरीत महाराष्ट्र राज्यात ठाणे जिल्ह्याचे स्थान हे साधारणतः वायव्य दिशेस बसून ठाणे जिल्ह्याच्या पूर्वेस नाशिक व अहमदनगर जिल्हे आहेत.दक्षिणेस पुणे जिल्हा आहे. नैऋत्येस मुंबई उपनगर जिल्हा आहे. पश्चिमेस अरबी समुद्र आहे. तर जिल्याच्या उत्तरेस गुजरात राज्य व दादरानगर हवेली क्रेंद्रशासीत प्रदेश आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या आवारात, **ठाणे सा.बां.मंडळ, ठाणे, स्टेशन रोड, ठाणे (पश्चिम)-४०० ६०१** या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील महत्वाच्या प्रशासकीय इमारतीत कार्यरत असून जिल्हयातील नागरिकांशी बांधिलकी जपण्यास कटीबध्द आहे. ही बांधिलकी **ठाणे बांधकाम विभाग, ठाणे** या सनदेव्दारे जाहिर करत असुन ती स्विकारीत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने निर्धारीत केलेल्या व पथदर्शीत केलेल्या सार्वजनिक सेवा तत्परतेने सौजन्यपूर्वक व सन्मानपूर्वक वागणूकीने उपलब्ध व्हाव्यात व नागरिकांचे सामाजिक प्रश्न सहानुभूर्तीपूर्वक सोडवावेत हा दृष्टीकोन तसेच सर्वसामान्य नागरिकांचे सार्वजनिक बांधकाम विभागा विषयीचे हक्क यांच्या पर्यंत प्रगतिच्या व विकासाच्या वाटेने अतिशय सुलभतेने पोहचविण्याचा हा ध्यास आहे.

ठाणे (सा.बां.) मंडळ, ठाणे हे कार्यालय ठाणे जिल्ह्यात येत असून त्यांच्या अखत्यारीत येत असलेल्या राज्य क्षेत्रातील सात विभागांपैकी, **ठाणे बांधकाम विभाग, ठाणे** एक विभाग आहे. ठाणे जिल्ह्याचा भौगोलिक विस्तार आशिया खंडात मोठा असल्यामुळे ठाणे जिल्हयाचा विकास प्रगति व नागरिकांचे प्रश्न याचा विचार करून ठाणे बांधकाम विभागाच्या कार्यक्षेत्रात “कल्याण”, “उल्हासनगर”, “अंबरनाथ” हे शहरी व “शहापूर”, “मुरबाड” हे ग्रामीण तालुके येत असून ही सनद त्या संदर्भात तयार करण्यात आली आहे.

१. आपल्या भारत देशाची धमनी समजले जाणारे व ठाणे बांधकाम विभागाच्या कार्यक्षेत्रात येणारे **राज्य महामार्ग** अतिशय उत्तम दर्जाचे करणे.
२. रस्ते विकास योजनेतील **ठाणे बांधकाम विभाग, ठाणे** च्या कार्यक्षेत्रातील रस्त्यांची नवीन बांधकामे, सुधारणा तसेच त्यावरील मोठे पूल, लहान पूल, मो-या यांची बांधकामे उत्तम दर्जाची व सुरक्षीत अशी करणे.
३. **ठाणे बांधकाम विभाग, ठाणे** च्या कार्यक्षेत्राअंतर्गत असलेल्या इमारती, रस्ते व पुलांची नियतकालीक देखभाल व दुरुस्ती उपलब्ध होणा-या निधीतून प्रभावीपणे करणे व सेवा व सुविधांचा स्तर उंचावर नेणे.
४. **ठाणे बांधकाम विभाग, ठाणे** अंतर्गत सर्व उपविभागांच्या अखत्यारीतील विविध शासकीय व निमशासकीय कार्यालयांचे ना हरकतींचे दाखले विहित कालावधीत प्रदान करणे.
५. **ठाणे बांधकाम विभाग, ठाणे** कार्यालयात व विभागाच्या अखत्यारीतील सर्व कार्यालयात प्रतिसाद वेळापत्रक प्रदर्शित करणे.

६. **ठाणे बांधकाम विभाग, ठाणे** च्या कार्यक्षेत्रात उदभवणा-या आपत्कालीन व्यवस्थेसाठी तत्परतेने स्थापत्य अभियांत्रिकाशी संबंधीत व जनहितार्थ आवश्यक ती कामे करणे व मदत करणे.

७. **ठाणे बांधकाम विभाग, ठाणे** कार्यालयात व विभागाच्या अखत्यारीतील सर्व कार्यालयातून कर्मचारी वर्गाची कर्तव्ये व जबाबदा-या फलकावर जाहिररित्या प्रदर्शित करणे.

८. ठाणे बांधकाम विभाग कार्यालयात व विभागीय कार्यालयाचे अखत्यारीतील प्रत्येक कार्यालयात ठरवून दिलेल्या दिवशी व वेळी सर्वसामान्य जनतेची गा-हाणी/तक्रारी ऐकणे व त्यांची प्रभावीपणे निराकरण करणे.

९. सार्वजनिक ठिकाणी सार्वजनिक कार्यक्रम व शासकीय कार्यक्रमात जनतेच्या सुरक्षिततेच्या तसेच अतिमहत्वाच्या (व्ही.आय.पी.) व्यक्तीसाठी वापरावयाचे मंडप, स्टेज इत्यादी बाबतीत सुरक्षिततेच्या दृष्टीने तपासणी करुन प्रमाणित करणे.

१०. माहितीचा अधिकारी अधिनियम २००५ अंतर्गत ठाणे बांधकाम विभागांतर्गत मागितलेली माहिती संबंधीतांना विहीत मुदतीत उपलब्ध करुन देणे बाबत सक्षम स्तरावर तत्पर कार्यवाही होणे.

११. ठाणे बांधकाम विभागाच्या कार्यालयाच्या कामकाजात सातत्य ठेवून व आधूनिकता आणून विभागीय कार्यालयाचे व सार्वजनिक बांधकाम विभागाची लोकभिमुखता वाढविणे.

१२.संगणकीकरणाबाबत विभागीय कार्यालय, सर्व उप विभागीय कार्यालये यांना अवगत करणे व नेटवर्कने जोडणे.

१३.विभागातंर्गत आवश्यक व अद्यावत विविध माहिती त्वरीत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या www.mahapwd.com या संकेत स्थळावर (वेबसाईटवर) उपलब्ध करणे व अद्यावत करणे.

१४. विभागातंर्गत येणा-या सर्व विषयाची अनुसुची तयार करणे व निपटारा करणेचा विहित कालावधी ठरविणे.

१५.विभागीय कार्यालय व अखत्यारीतील सर्व उपविभाग कार्यालयामध्ये राजीव गांधी अभियांनाअंतर्गत सर्व अभिलेखे अद्ययावत करणे व त्याची वर्गवारी करुन अभिलेख कक्ष नोंदवहीसह अद्यायावत करणे

१६.विभागाच्या कामकाजात पारदर्शकता व सुसूत्रता आणणे व गतीशिल प्रशासकीय कामकाजाचा अवलंब करणे.

१७. नागरिकांच्या प्रश्नांची व विभागाशी संबंधीत असलेल्या विषयाची माहिती व केलेली कार्यवाही नागरिकापर्यंत पोहचवण्यासाठी विशेष उपक्रम राबविणे.

१८.विभागाच्या कार्यक्षेत्रात येणारे ग्रामपंचायत स्तरापासून ते विधानसभेच्या, लोकसभेच्या प्रतिनिधींपर्यत त्यांना आवश्यक असलेली माहिती त्वरीत पुरविणे व जनसंपर्क ठेवणे.

१९.विभागांतर्गत व विभागाच्या अखत्यारीतील सर्व उपविभाग कार्यालयामध्ये अतिशय सौजन्यपूर्ण सेवाभावी व उत्साहीत वातावरण ठेवणे.

२०. दैनंदिन कामकाजात आधुनिकता, गतिमानता व गुणवत्ता आणणेसाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करणे व **सार्वजनिक बांधकाम विभागाची प्रतिमा उज्वल करणे.**

२१.नागरिकांच्या सनदेस व्यापक प्रसिध्दी देणे.

## २. ठाणे बांधकाम विभाग कार्यालयाची बांधिलकी व नागरिकांची जबाबदारी

### १. <u>विभागीय कार्यालयाची बांधिलकी</u> :-

वरील सर्व कर्तव्ये पार पाडतांना ठाणे बांधकाम विभाग ठाणे.

अ) सेवेच्या गुणवत्तेची बांधिलकी ठेवील.

ब) सौजन्यपूर्ण व आपुलकीची भावना ठेवून कामाचा वेळेत निपटारा करेल.

क) पारदर्शकता व निष्ठा ठेवील.

यासाठी वेळोवेळी विविध परवानापत्रे / प्रमाणपत्रे मिळविण्यासाठी कार्यपध्दती, पत्रके नागरिकांच्या माहितीसाठी उपलब्ध करण्यात येतील.

### २. <u>नागरिकांची जबाबदारी</u> :-

- शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचेशी नागरिकांची वर्तणूक सौजन्यपूर्वक असावी.
- नागरिकांकडून आवश्यक असलेली माहिती व कागदपत्रे परिपूर्णरित्या मिळावी.
- नागरिकांचा प्रतिसाद विकासाला मदत करणारा असावा.
- विहीत केलेल्या कालावधीपेक्षा कमी कालावधीत सेवा पुरविण्याचा आग्रह धरु नये.
- सार्वजनिक मालमत्तेची व्यवस्था पाहण्यास सहकार्य करावे.
- नागरिकांनी स्वेच्छेने अतिक्रमणे दूर करावीत व पुन्हा सरकारी जागांवर अतिक्रमणे करु नयेत.

- रस्त्याच्या दोन्ही बाजूंना असणा-या वृक्षराजींचे जतन ही नागरिकांची सुध्दा जबाबदारी राहील.
- नागरिकांनी कायदेशीर तरतुदी, नियम, अलिखीत संकेत यांचे पालन करावे.
- नागरिकांनी सार्वजनिक हित, एकात्मता व अखंडता जोपासण्यासाठी सहकार्याची भावना ठेवावी.

## ३. ठाणे बांधकाम विभाग कार्यालयाची रचना

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रादेशिक स्तरावरील मुख्य अभियंता हे सर्वोच्च तांत्रिक अधिकारी असून त्यांची मुख्यालये, मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपुर व अमरावती या ठिकाणी आहेत. प्रादेशिक विभागांतर्गत कामांची अमंलबजावणी व प्रशासनिक नियंत्रण मुख्य अभियंता स्तरावर होते. सदर प्रत्येक प्रादेशिक विभागाच्या मुख्य अभियंत्याचे अखत्यारित जिल्हा स्तरावर सर्वसाधारणपणे अधीक्षक अभियंता दर्जाचे अधिकारी मंडळांतर्गत कामांची अंमलबजावणी व प्रशासनिक नियंत्रण याची जबाबदारी सांभाळतात. अधीक्षक अभियंता यांचे अखत्यारीतील असलेल्या विभागांची जबाबदारी कार्यकारी अभियंता दर्जाचे अधिकारी सांभाळतात.

मुंबई सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभागांतर्गत अधीक्षक अभियंता, ठाणे (सा. बां.) मंडळ, ठाणे यांचे कार्यालय असून त्यांचे कार्यक्षेत्र ठाणे जिल्हा आहे. ठाणे (सा. बां.) मंडळाचे क्षेत्रिय अधीक्षक अभियंता यांचे अधिपत्याखाली एकूण ९ कार्यकारी अभियंता कार्यरत असून त्यांचे प्रत्येकाचे कार्यक्षेत्र ४ ते ५ तालुक्यांचे आहे. प्रत्येक कार्यकारी अभियंता यांचे अधिपत्याखाली ५ ते ६ उप अभियंता कार्यरत आहेत.

**या ९ विभागांपैकीच ठाणे बांधकाम विभाग, ठाणे** हा विभाग असून कार्यकारी अभियंता यांचे अधिपत्याखाली **कल्याण, उल्हासनगर, अंबरनाथ** हे शहरी तालुके तसेच **शहापूर व मुरबाड** हे ग्रामीण भागातील तालुके येतात. सर्वसाधारणपणे उप अभियंत्याकडे तालुक्याचे कार्यक्षेत्र आहे. राष्ट्रीय महामार्गाच्या बाबतीत कार्यक्षेत्राचा निकष रस्त्याच्या लांबीनुसार आहे. राज्यक्षेत्र व स्थानिक क्षेत्र (जिल्हा परिषद) यांचेकडील कामांसाठी स्वतंत्र कार्यकारी अभियंता व उप अभियंता आहेत. अधीक्षक अभियंता यांचे कार्यक्षेत्राचा नकाशा,

कार्यकारी अभियंता व उप अभियंता यांची मुख्यालये दर्शविणारा वृक्ष तक्ता सोबत जोडला आहे. (परिशिष्ट अ)

**ठाणे बांधकाम विभागाकडे** ठाणे जिल्हयातील कल्याण, उल्हासनगर, अंबरनाथ, मुरबाड व शहापूर या पाच तालुक्यांचे कार्यक्षेत्र आहे. कार्यक्षेत्राची विभागणी कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग, ठाणे यांचे अधिकार क्षेत्रात झालेली असून त्यांचे मुख्यालय ठाणे येथे आहे. कार्यकारी अभियंता यांचे अधिकार क्षेत्रातील बांधकाम विभाग हेच ख-या अर्थाने माहितीचे स्त्रोत आहेत. कुठल्याही बांधकामाची सविस्तर माहिती अगदी सुरवातीपासून अशी संबंधीत कार्यकारी अभियंता यांचे कार्यालयात मिळू शकते. कार्यकारी अभियंता हे विभागांतर्गत प्रत्येक तांत्रिक बाबीसाठी जबाबदार असे अधिकारी आहेत.

ठाणे (सा.बां.) मंडळाच्या वरील स्थापत्य अभियांत्रिकी रचने व्यतिरिक्त प्रत्येक प्रादेशिक विभागांतर्गत अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ यांचे कार्यालय सलग्नपणे कार्यरत आहे. सदर कार्यालयाचे मुख्य काम म्हणजे प्रादेशिक विभागातील सर्व मंडळ कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील बांधकामांची गुणवत्तादृष्टया निरिक्षणे करणे व विभागांतर्गत प्रशिक्षण देणे. तसेच बांधकाम साहित्याची प्रयोगशाळेत चाचणी करणे हे आहे. त्याप्रमाणे ठाणे (सा.बां.) मंडळांतर्गत क्षेत्रिय कामांची निरिक्षणे व बांधकाम साहित्याच्या चाचण्या,विविध प्रकारची प्रशिक्षणे अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ या कार्यालयाकडून वेळोवेळी घेण्यात येतात.

त्याच प्रमाणे ठाणे (सा.बां.) मंडळांतर्गत येणारी विशिष्ट कामे उदा. यांत्रिक, विद्युत, संकल्पचित्र, वास्तुशास्त्र, उपवने व उद्याने यांचेशी संबंधीत असल्यास त्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियंत्रणाखाली सक्षम कार्यालयाकडून करण्यात येतात.

प्रस्तावनेत नमुद केलेल्या सार्वजनिक सेवा सार्वजनिक बांधकाम विभाग पुरवित असतो. मंडळांतर्गत कामांच्या अंमलबजावणीसाठी सा.बां. नियमावली, लेखा संहिता, विनिर्देश, वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रके इत्यादीचे काटेकोरपणे पालन क्षेत्रिय अधिका-याकडून केले जाते.

**४. ठाणे बांधकाम विभाग कार्यालयाचे कार्यक्षेत्र :-**

ठाणे (सा.बां.) मंडळ, ठाणे या कार्यालयाचे कार्यक्षेत्र ठाणे जिल्हयातील एकूण १५ तालुक्यात विखुरलेले आहे. ठाणे जिल्हयाचे भौगोलिक क्षेत्र एकुण ९,५५८ चौ.कि.मी. असुन १६६.१० कि.मी. सागरी किनारपट्टी आहे. ठाणे (सा.बां.) मंडळाचा चार लोकसभा व चोविस विधानसभा मतदार सघांशी सबंध येतो. मंडळांतर्गत कार्यक्षेत्राशी पाच विधानपरिषदेचे सदस्य निगडीत आहेत. लोकसभा / विधानसभा / विधानपरिषद सदस्य यांचे सार्वजनिक बांधकाम विभागाशी निगडीत असलेली मतदारसंघातील कामे प्राधान्याने आवश्यकतेनुसार व निधीशी अधीन राहून हाती घेण्यात येतात. **त्यापैकीच ठाणे बांधकाम विभागाच्या कार्यक्षेत्रात कल्याण, उल्हासनगर, अंबरनाथ, शहापूर व मुरबाड असे ५ तालुके येत असून त्यांचे भौगोलिक क्षेत्र एकूण ३१५३.०४ चौ.कि.मी. आहे.**

ठाणे (सा.बां.) मंडळांतर्गत एकुण ९ विभाग असुन, राज्यक्षेत्र व स्थानिक क्षेत्र यामध्ये विभागलेले आहेत. राज्यक्षेत्राचे ७ विभाग असुन ते ठाणे येथे ४, जव्हार येथे १, मुलुंड येथे १ व कोकण भवन नवी मुंबई मार्ग प्रकल्प विभाग असे आहेत, व स्थानिक क्षेत्राचा एक विभाग जिल्हा परिषद बांधकाम विभाग,(पश्चिम) ठाणे व जिल्हा परिषद बांधकाम विभाग (पूर्व) जव्हार येथे आहे. या प्रत्येक विभागांतर्गत उपविभागीय कार्यालये कार्यरत असून एकुण ५५ उपअभियंते, उपविभागीय कार्यालयाची जबाबदारी सांभाळतात. **त्यापैकीच ठाणे बांधकाम विभागा अंतर्गत, कल्याण, शहापूर, मुरबाड व उल्हासनगर हे सा.बां.उपविभाग कार्यरत असून रोजगार हमी योजनेच्या कामांसाठी शहापूर व मुरबाड या ठिकाणी दोन स्वतंत्र उपविभाग कार्यरत आहेत. अशाप्रकारे एकूण ६**

**उपविभाग व त्यासाठी ६ उप अभियंता तसेच ३० शाखा अभियंता क्षेत्रिय कामांसाठी कार्यरत आहेत(सोबत या विभागाची सुची व मुख्यालय परिशिष्ट "ब")**

ठाणे (सा.बां.) मंडळांतर्गत राज्यक्षेत्रातील राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग, प्रमुख जिल्हा मार्ग तसेच स्थानिक क्षेत्रातील इतर जिल्हा मार्ग, व ग्रामीण मार्ग यांची दर्जेनिहाय लांबी व सदर रस्त्यांवर येणारे लहान व मोठे पुल यांची सुची परिशिष्ट "क" प्रमाणे सोबत जोडण्यात येत आहे. मंडळाच्या कार्यक्षेत्रातंर्गत प्रामुख्याने राष्ट्रीय महामार्ग क्र.२२२ कि.मी. ते कि.मी. ९५/५७० हा भाग येतो पैकी कि.मी. ५/०० ते कि.मी. ९.३०० कल्याण डोंबिवली महानगर पालिकेकडे आहे. मंडळाच्या कार्यक्षेत्रांतर्गत एकुण ४५२९५६.०० चौ.मी. जोतेक्षेत्रफळ प्रशासकीय इमारतींचे व ३४३६२८.२८ चौ.मी. क्षेत्रफळ निवासी इमारतींचे आहे. (ब) त्यापैकी ठाणे बांधकाम विभागाच्या कार्यक्षेत्रातील रस्त्यांची माहिती परिशिष्ट "क" मध्ये दर्शविली आहे. **ठाणे बांधकाम विभागाच्या अखत्यारीत निवासी क्षेत्र ७५१५३.३८ चौ.मीटर तर अनिवासी क्षेत्र ७२७४४.३१ चौ.मी. असे एकूण १,४७,८९७.६९ चौ.मी. जोते क्षेत्रफळ देखभाल व दुरुस्तीसाठी आहे.**

**५. ठाणे बांधकाम विभाग कार्यालयाअंतर्गत कार्यपुर्तीचे वेळापत्रक, माहितीची सुलभता व खाजगी करण.**

**अ) कार्यपूर्तीचे वेळापत्रक**

मंडळ कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील ठेकेदारांची नोंदणी, विविध ना हरकत प्रमाणपत्रे मिळण्यासाठी लागणारा कालावधी त्यास सक्षम अधिकारी इत्यादीची माहिती तसेच रस्ते, पूल व इमारती आणि इतर कामांविषयीची

माहिती कार्यपूर्तीचे वेळापत्रकात (परिशिष्ट 'ड') नमूद केली आहे. अर्जाचा विहीत नमुना व जोडावयाची आवश्यक कागदपत्रे याची माहिती विहीत फी भरुन संबंधित विभागीय कार्यालयात मिळू शकेल.

नैसर्गीक आपत्ती कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न इ. उद्‌भवल्यास या वेळापत्रकातील कार्यपूर्तीच्या कालावधीत वाढ होऊ शकेल.

**ब) माहितीची सुलभता**

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या WWW.mahapwd.com या वेबसाईटवरुन (संकेत स्थळावरुन) वेळोवेळी सादर केल्या जाणा-या मंडळातंर्गत माहितीचा तपशील व आकडेवरीचा तपशील जनतेला सुलभतेने उपलब्ध होईल.

## क) खाजगीकरण

अंबरनाथ तालुक्यातील मलंगवाडी येथील हाजीमलंग दर्गा हे धार्मिक स्थळ आहे. हया धार्मिक स्थळास सर्वसाधारण रोज २ ते ३ हजार भाविक भेट देतात. फेब्रुवारी महिन्यातील वार्षिक उरुसाचे वेळी (यात्रा) अंदाजे १.०० ते १.५० लाख भाविक या स्थळाला भेट देतात. हे धार्मिक पर्यटन स्थळ ब या प्रकाराने वर्गीकृत आहे.

हया धार्मिक स्थळाला जाण्याकरीता कल्याण रेल्वे स्टेशन ते मलंगवाडी पायथ्यापर्यंत प्रजिमा-६२ दर्जाचा डांबरी पृष्ठभागाचा रस्ता आहे. मलंगवाडी ते मलंगगडावरील दर्ग्यापर्यंत जाण्यास ५.०० कि.मी. लांबीचा पायथ्यापासून दर्गा सर्वसाधारण ४२५ मीटर उंचीवर आहे. सदर ठिकाणी जाण्यास वाहतुकीचा अन्य रस्ता नसल्यामुळे पायऱ्यांच्या मार्गाने चालत जाण्याचा प्रवास त्रासदायक व कठीण आहे. यास्तव श्रीमलंगगडाच्या पायथ्यापासून दर्ग्यापर्यंत जाणाऱ्या रस्त्याचे बांधकाम करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यामध्ये मोठया प्रमाणात वनजमीनीचे संपादन करणे आवश्यक होते.

यास्तव हया ठिकाणी फ्युनिक्यूलर ट्रॉलीचे बांधकाम केल्यास लोकांची गैरसोय दूर होणार असल्याने शासनाने पायथ्यापासून दर्ग्यापर्यंत जाण्यासाठी **“बांधा वापरा व हस्तांतरीत करा”** या तत्वावर फ्युनिक्यूलर ट्रॉली यंत्रणा बसविण्याच्या प्रस्तावास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उद्योजक निश्चिती करण्यांत आली आहे. तसेच वन विभागाचे क्षेत्र हस्तांतरीत करण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाकडून गठीत सशक्तता समितीची परवानगी मिळाली असून त्या अनुषंगाने कार्यारंभ आदेश देवून लगेचच कामांस सुरुवात करण्यांत आली आहे.

## ६. विभागीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील रस्ते सुरक्षितता.

रस्त्यांची सुरक्षितता वाढविण्यासाठी शासनाने ‘अपघात निवारण समिती‘ स्थापन केली आहे. ही समिती प्रत्यक्ष पहाणी करुन रस्त्यांवरील अपघात प्रवण स्थळे शोधते व अशा स्थळांची सुधारणा करण्यासाठी उपाययोजना सुचविते.

अपघात निवारण समितीने विभागांतर्गत कार्यक्षेत्रातील रस्त्यांची प्रत्यक्ष पहाणी करुन सुचविलेल्या अपघात प्रवण स्थळांची सुधारणा व उपाययोजना टप्प्या-टप्प्याने हाती घेऊन पूर्ण करण्यात येते. यामध्ये या विभागाच्या कार्यक्षेत्रात प्रामुख्याने अपघात प्रवण स्थळे समितीने सुचविली असून, प्राधान्यक्रमाने शतप्रतिशत अपघात प्रवण स्थळांची सुधारणा विभागाने केली आहे. विभागातंर्गत रस्ते सुरक्षिततेवर भर देण्यात येत असून तपशीलवार व आवश्यक असे माहिती फलक रस्त्यांवर लावण्यात येत आहेत, जेणेकरुन रस्ते वाहतुकीस पादचा-यांसह सर्वांना सर्वकाळ सुरक्षित ठेवण्याचा मानस आहे.

## ७. गा-हाण्यांचे निराकरण सनदेचा आढावा व जनसामान्यांची छाननी.

### अ) गा-हाणी/तक्रारी यांचे निराकरण

नागरिकांच्या गा-हाण्यांचे निराकरण विहीत कालावधीत करणे हे विभागाचे प्रमुख उद्दिष्ट राहिल. कार्यपुर्तीस होणारा विलंब व अन्य काही गा-हाणी विभागीय कार्यालयाच्या अखत्यारीतील कार्यालयाबाबत अथवा मंडळातंर्गत काही कामाबाबत असतील तर, त्यासाठी नागरिकांनी ज्या विशिष्ट कार्यालयाविरुध्द गा-हाणे/तक्रार असेल तर त्या कार्यालयाच्या वरिष्ठ कार्यालय प्रमुखांकडे तक्रार नोंदवावी म्हणजे उदाहरणार्थ - उपविभागीय कार्यालयाविरुध्द गा-हाणे/तक्रारी असल्यास विभागीय कार्यालय प्रमुखांकडे म्हणजे कार्यकारी अभियंता यांचेकडे गा-हाणे मांडावे व विभाग कार्यालयाविरुध्द गा-हाणे/तक्रार असल्यास मंडळ कार्यालयाच्या अधीक्षक अभियंत्यांकडे गा-हाणे मांडावे. अशा गा-हाणी/तक्रारींचे निराकरण वरिष्ठ कार्यालयाकडून ७ दिवसांत करण्यात येईल. गा-हाणी/तक्रारी नोंदविण्यासाठी प्रत्येक कार्यालयात स्वतंत्र पेटी ठेवण्यात आलेली आहे.

गा-हाणी समक्ष भेटीत/पत्राने वा ई-मेल द्वारेही नागरिक मांडू शकतात.

### ब) नागरिकांच्या सनदेचा आढावा / सिंहावलोकन

ठाणे बांधकाम विभागाच्या या नागरिकांच्या सनदेच्या उपयुक्ततेबाबतचा तथा परिणामकारकतेचा आढावा विभागांतर्गत घेण्यात येईल व त्याचा अहवाल वरिष्ठ कार्यालयाकडे सादर करण्यात येईल.

## क) जनसामान्यांकडून सुचना

ठाणे बांधकाम विभागाची ही नागरिकांची सनद सर्वसामान्य नागरिकांच्या छाननीसाठी नेहमीच खुली असेल व सन्माननीय नागरिकांच्या बहुमुल्य सुचनांचा गांभिर्यपूर्वक विचार करुन त्यात वेळोवेळी सुधारणा घडवून आणता येईल. ही नागरिकांची सनद स्वतःहून काही नवीन कायदेशीर हक्क निर्माण करीत नाही. ती ग्राहकांना म्हणजेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सेवा उपभोगणा-या नागरिकांना जादा हक्क मांडण्यासाठी मदत करते.

## ८. नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी व प्रतिसाद

सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत ठाणे (सा.बां.) मंडळ, ठाणे कार्यालयाच्या अखत्यारीतील **ठाणे बांधकाम विभागाच्या नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी दिनांक २८ मे २००७** पासून करण्यात आली असून ती अद्यावत करुन **दिनांक ३१-०३-२०१२** रोजी पुन्हा प्रसिध्द करण्यात येत आहे.

सनदेस व्यापक प्रसिध्दी देऊन नागरिकांच्या प्रतिक्रिया/अभिप्राय मागविण्यात येतील व त्यांच्या सूचनांचा यथोचित आदर करुन आवश्यक बदल करण्यात येतील.

ठाणे बांधकाम विभाग खात्रीपूर्वक गुणवतेची सेवा पुरविण्याची हमी देत आहे. विभागाच्या अखत्यारीतील कुठल्याही माहितीसाठी नागरिकांना संवेदनशील सौजन्यपूर्ण व मदत करण्याच्या भावनेने वर्तणूक मिळेल. ग्राहक केंद्रित सेवेची उद्दिष्टे प्राधान्याने अंगीकारुन ग्राहकांना त्वरीत प्रतिसाद दिला जाईल. कार्यपध्दती अधिक लोकाभिमुख, सुलभ व आटोपशिर करण्यासाठी नागरिकांचा सल्ला घेतला जाईल.

प्रशिक्षित व प्रोत्साहित कर्मचारी वर्गाद्वारे नविन तंत्र वापरुन ग्राहकांना सेवा पुरविली जाईल. भ्रष्टाचारास आळा घालण्यात येईल. तसेच नागरिकांच्या गा-हाण्यांचे कालबध्द निराकरण करण्यात येईल व तक्रारशुन्य सेवा असल्याची खात्री करण्यात येईल.

## ९. परिशिष्टे

अ) (१) मुख्यालय दर्शविणारा वृक्षतक्ता व

(२) कार्यक्षेत्राचा नकाशा जोडला आहे.

ब) विभाग / उपविभाग कार्यालयाची सूची व मुख्यालय


क) कार्यक्षेत्रातील दर्जेनिहाय रस्ते लांबी व लहान/मोठे पूल यांची सूची

ड) कार्यपूर्तीचे वेळापत्रक

इ) रस्ते विकास योजना २००१-२०२१ मध्ये प्रस्तावित करण्यात आलेली रस्ते विकास योजनांची सुची.

श्री.व्ही.एल.कांबळे
कार्यकारी अभियंता
ठाणे बांधकाम विभाग, ठाणे

| श्री.के.एस.एन.प्रसाद उप कार्यकारी अभियंता ठाणे बांधकाम विभा, ठाणे | श्री.पां.ना.देसले, उप विभागीय अभियंता सा.बां.उप विभाग, कल्याण | श्री.एस.यु.चौधरी उप विभागीय अभियंता सा.बां.उप विभाग, उल्हासनगर | श्री.डी.आर.थोरात उप विभागीय अभियंता सा.बां.उप विभाग, मुरबाड | श्री.ए.एस.बोरसे. उप विभागीय अभियंता सा.बां.उप विभाग, शहापूर | श्री.ए.एस.बोरसे. उप विभागीय अभियंता(अतिरिक्त कार्यभार) रोजगार हमी योजना (सा.बां.) उप विभाग, शहापूर | श्री.डी.आर.थोरात उप विभागीय अभियंता रोजगार हमी योजना (सा.बां.) उप विभाग, मुरबाड (अतिरिक्त कार्यभार) |
|---|---|---|---|---|---|---|
| श्री.एस.पी.अवसरकर, शाखा अभियंता | श्री.एस.बी.लगड शाखा अभियंता | श्री.आर.आर.सोमवंशी, सहा.अभि.श्रेणी-२ | श्री.पी.डी.राखाडे, शाखा अभियंता | श्री.ए.पी.भानुशाली शाखा अभियंता | श्री.पी.एम.गोरे, शाखा अभियंता | श्री.एस.एम.गायकवाड शाखा अभियंता |
| श्री.एस.डी.सांबारे, सहा.अभि.श्रेणी-२ | श्री.एस.एम.ढिलपे, सहा.अभि.श्रेणी-२ | श्री.डी.एल.चौधरी, शाखा अभियंता | श्री.एम.बी.हिरवे, शाखा अभियंता | श्री.पी.टी.बच्छाव सहा.अभि.श्रेणी-२ | | श्री.एस.एम.ढिलपे, सहा.अभि.श्रेणी-२ |
| श्रीमती.एस.ए.मोहरीर, सहा.अभि.श्रेणी-२ | श्री.सु.वा.विसावे सहा.अभि.श्रेणी-२ | श्री.एस.डी.चौधरी, शाखा अभियंता | श्री.डी.बी.पंडीत, शाखा अभियंता | श्री.एस.एन.कोरडे, शाखा अभियंता | | श्री.ए.बी.लाड शाखा अभियंता |
| श्रीमती.एल.एस.लाहोटी, सहा.अभि.श्रेणी-२ | श्री.पी.टी.मानकर शाखा अभियंता | श्री.एस.व्ही.बच्छाव शाखा अभियंता | श्री.अनिल संतोष पवार सहा.अभि.श्रेणी-२ | श्री.एन.बी.पाटील, शाखा अभियंता | | |
| | | श्री.सी.बी.बाळदकर शाखा अभियंता | | | | |


ठाणे जिल्हा
राष्ट्रीय महामार्ग
जिल्हा प्रमुख मार्ग
रेल्वे मार्ग
तालुका मुख्यालय
तलासरी
डहाणू
मोखाडा
जव्हार
विक्रमगड
पालघर
वाडा
शहापूर
भिवंडी
कल्याण
मुरबाड
ठाणे
अंबरनाथ
उल्हासनगर
उ
० १० २० ३०
किलोमीटर

## मंडळातंर्गत विभाग / उप-विभाग निहाय तक्ता

| अ.क्र. | मंडळ/विभाग कार्यालय/उप विभागीय कार्यालये |
|---|---|
| १ | २ |
| ● | **मंडळ कार्यालय** |
| ● | **कार्यकारी अभियंता, ठाणे (सा.बां.) विभाग, ठाणे** |
| | सा. बां. उपविभाग क्र.१, ठाणे. |
| | सा. बां. उपविभाग क्र.२, ठाणे. |
| | सा. बां. उपविभाग क्र.३, ठाणे. |
| | सा. बां. उपविभाग पालघर |
| | सा. बां. उपविभाग वसई |
| | सा. बां. उपविभाग भिवंडी |
| | यांत्रिकी (सा.बां.) उपविभाग ठाणे |
| ● | **कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, ठाणे.** |
| | **सा. बां. उपविभाग क्र. १ कल्याण** |
| | **सा. बां. उपविभाग क्र.२ कल्याण मुख्यालय मुरबाड (रो.ह.यो)** |
| | **सा. बां. उपविभाग, उल्हासनगर** |
| | **सा. बां. उपविभाग, मुरबाड** |
| | **सा. बां. उपविभाग, शहापूर** |
| | **रोहयो उपविभाग शहापूर** |

| | |
|---|---|
| ● | **कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, जव्हार.** |
| | सा.बां. उपविभाग, जव्हार |
| | सा.बां. उपविभाग, मोखाडा |
| | सा.बां. उपविभाग डहाणू |
| | सा.बां. उपविभाग तलासरी |
| | सा.बां. उपविभाग वाडा |
| | विक्रमगड सा.बां. उपविभाग वाडा |

| | |
|---|---|
| ● | **कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प (सा.बां.) विभाग, ठाणे.** |
| | विशेष प्रकल्प उपविभाग, ठाणे |
| | विशेष प्रकल्प उपविभाग, भिवंडी |
| | विशेष प्रकल्प उपविभाग, कल्याण |
| | विशेष प्रकल्प उपविभाग, पालघर |
| | विशेष प्रकल्प उपविभाग क्र. २ ठाणे. |
| ● | **कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग, कोकण भवन नवी मुंबई** |
| | मार्ग प्रकल्प उपविभाग, क्र. १, ठाणे. |
| | आदिवासी मार्ग प्रकल्प उपविभाग, क्र. २, ठाणे |
| | मार्ग प्रकल्प उपविभाग, क्र. ३, कोकण भवन, नवी मुंबई. |
| | मार्ग प्रकल्प उपविभाग, क्र. ४, कोकण भवन, नवी मुंबई. |
| | पूल पहाणी उपविभाग कोकण भवन नवी मुंबई. |

| | |
|---|---|
| ● | **कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, क्र. ३ ठाणे** |
| | राष्ट्रीय महामार्ग उपविभाग क्र.९ ठाणे |
| | राष्ट्रीय महामार्ग उपविभाग क्र. ३३, शहापूर मुख्यालय ठाणे |
| | राष्ट्रीय महामार्ग उपविभाग , ठाणे मुख्यालय मुरबाड |

| | |
|---|---|
| ● | **कार्यकारी अभियंता, इमारती बांधकाम विभाग, मुलूंड, मुख्यालय, मुलूंड.** |
| | इमारती बांधकाम उपविभाग क्र.१ मुलुंड, मुख्यालय मुलुंड. |
| | इमारती बांधकाम उपविभाग क्र.२ मुलुंड, मुख्यालय मुलुंड. |
| | इमारती बांधकाम उपविभाग क्र.३ मुलुंड, मुख्यालय मुलुंड. |
| | इमारती बांधकाम उपविभाग क्र.४ अंधेरी, मुख्यालय अंधेरी. |

## मंडळाच्या कार्यक्षेत्रातील लहान मोठे पूल यांची सूची
## ३१/३/२०१२ अखेर

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | मोठे पूल | छोटे पूल | मो-या |
|---|---|---|---|---|
| १. | राष्ट्रीय महामार्ग विभाग, ठाणे | ११ | २३ | ४७२ |
| २. | सार्वजनिक बांधकाम विभाग,ठाणे. | २७ | ८१ | १४४७ |
| **३.** | **बांधकाम विभाग, ठाणे.** | **३३** | **५०** | **१७२७** |
| ४. | सार्वजनिक बांधकाम विभाग,जव्हार | ४३ | १५४ | २५४२ |
| ५. | जिल्हा परिषद,(पश्चिम)ठाणे | १० | १९ | १३११ |
| ६. | जिल्हा परिषद,(पूर्व) जव्हार | ४ | ३९ | ३०२४ |
| | **एकूण** | **१३७** | **३६३** | **१०५२२** |

## परिशिष्ट ड
## कार्यपूर्तीचे वेळापत्रक-२०१२

| अ.क्र. | कार्यसूची | कार्यवाही करणारा सक्षम अधिकारी | कार्यपूर्तीचा कालावधी मर्यादा |
|---|---|---|---|
| १ | कंत्राटदार वर्ग १अ (अमर्याद),१ब (रू.१५ कोटी पेक्षा जास्त ५ कोटी पर्यंत ), १ क ( रू.७.५० कोटी ते १५कोटी पर्यंत ),वर्ग २ (रू.३ कोटी ते ७.५० कोटी ) व वर्ग ३ (रू. १.५० कोटी ते ३ कोटी ) यांची नोंदणी व विहित मर्यादे नंतर नुतनीकरण | सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई | १५ दिवस वरिष्ठ कार्यालयास सादर करणे. |
| २ | कंत्राटदार वर्ग ४ (रू ९० लक्ष पेक्षा जास्त ते १५० लक्ष ) व वर्ग ४(अ) ( रू. ५० लक्ष पेक्षा जास्त ते ९० लक्ष ) नोंदणी व विहित मर्यादे नंतर नुतनीकरण | मुख्य अभियंता, क्षेत्रिय कार्यालय | १५ दिवस वरिष्ठ कार्यालयास सादर करणे. |
| ३ | कंत्राटदार वर्ग ५(रू.१५ लक्ष पेक्षा जास्त ते ५० लक्ष) , वर्ग ६ (रू.७ लक्ष पेक्षा जास्त ते १५ लक्ष ) आणि बेरोजगार अभियंतांचे नोंदणीकरण(रू.३०.०० लक्ष पर्यंत) व मजूर सहकारी संस्था वर्ग अ (रू.१५.००लक्ष पर्यंत) यांचे वर्गीकरण व नुतनीकरण. | अधीक्षक अभियंता | ३० दिवस |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | कंत्राटदार वर्ग ७ (रू.३ लक्ष पेक्षा जास्त ते ७ लक्ष पर्यत ),वर्ग ८ (रू.२ लक्ष पेक्षा जास्त ते ३ लक्ष पर्यंत ), वर्ग ९ (रू.२ लक्ष पर्यंत) आणि मजूर कामगार सहकारी संस्था वर्ग ब (रू. ७.५० लक्ष पर्यंत)यांचे वर्गीकरण, इमारत देखभाल व स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकाची परिक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांचे वर्ग ७ मध्ये नोंदणीकरण व नुतनीकरण | **कार्यकारीअभियंता** | ३० दिवस |
| ५ | विश्रामगृहाचे आरक्षणपत्र | **कार्यकारी अभियंता** | ७ दिवस शिवाय ऑनलाईन आरक्षणही उपलब्ध |
| ६ | रस्त्याच्या कडेला असलेल्या इमारतीचा ना हरकत परवाना | **कार्यकारी अभियंता** | ३० दिवस |
| ७ | पेट्रोल पंप आणि पेट्रोल पंपाच्या पोहोच मार्गाचे ना हरकत प्रमाणपत्र | महाराष्ट्र शासन | १५ दिवस वरिष्ठ कार्यालयास सादर करणे. |
| ८ | रस्ता ओलांडून जाणा-या वाहिन्यांसाठी ना हरकत प्रमाणपत्र | केंद्रशासन, राष्ट्रीय महामार्गासाठी व मुख्य अभियंता / अधीक्षक अभियंता इतर मार्गासाठी | १५ दिवस वरिष्ठ कार्यालयास सादर करणे. |
| ९ | चलतचित्र गृहाचे योग्यता प्रमाणपत्र | कार्यकारी अभियंता | १५ दिवस |
| १० | सरकारी इमारतीचे ना उपलब्धता प्रमाणपत्र | कार्यकारी अभियंता | १५ दिवस |
| ११ | सरकारी निवासस्थान न मिळण्याचे प्रमाणपत्र (अनुपलब्धता) | कार्यकारी अभियंता | १५ दिवस |

| | | | |
|---|---|---|---|
| १२ | सरकारी निवासस्थान मिळण्याबाबतचे प्रतिक्षा यादी क्रमांक | कार्यकारी अभियंता | ७ दिवस |
| १३ | सरकारी निवासस्थानी राहणा-या निवृत्त कर्मचा-यांच्या बाबतचे ना हरकत दाखले | कार्यकारी अभियंता | ३० दिवस |
| १४ | रास्त भाडे / प्रमाणभाडे प्रमाणपत्र | कार्यकारी अभियंता | १५ दिवस |
| १५ | इमारतींच्या भाडयाचे निश्चितीकरण | कार्यकारी अभियंता | १५ दिवस |
| १६ | इमारतींचे मूल्य निश्चितीकरण | कार्यकारी अभियंता | ३० दिवस |

टिप - सर्व वर्गाच्या नोंदणी व नुतनीकरण करणेसाठी अर्ज कार्यकारी अभियंता यांचेकडे स्विकारण्यात येतात.

# परिशिष्ट-क

## प्रकार व पृष्ठभाग त्यानुसार रस्त्याची लांबी (कि.मी.)

**जिल्हा :- ठाणे (सन २०१०-११) मार्च -२०११ अखेर ठाणे सा.बां. मंडळ, ठाणे**

| अ. क्र. | बाब | रस्त्याचा प्रकार | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | रा.म.मा. | प्रमुख राज्य मार्ग | राज्य मार्ग | प्रमुख जिल्हा मार्ग | इतर जिल्हा मार्ग | ग्रामीण मार्ग | इतर योजनेत्तर | एकूण रस्त्याची लांबी |
| १ | **सिमेंट काँक्रीट** | | | | | | | | |
| | अ) सा.बां.विभाग | १.७७४ | ० | ० | ०.१०० | ० | ० | ० | १.८७४ |
| | ब) जिल्हा परिषद | ० | ० | ० | ० | ३.००० | १५.६६० | ० | १८.६६० |
| | क) न.पा./म.न.पा. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ०.००० |
| २ | **डांबरी** | | | | | | | | |
| | अ) सा.बां.विभाग | ११०.४२० | १२४.५१५ | ८९१.७०५ | ७५७.७८० | ० | ० | ० | १८८४.४२० |
| | ब) जिल्हा परिषद | ० | ० | ० | १०३.५२० | ९००.६९० | १९३४.११० | ० | २९३८.३२० |
| | क) न.पा./म.न.पा. | | | | | | | | |
| ३ | **खडीचे** | | | | | | | | |
| | अ) सा.बां.विभाग | ० | ० | १२.७२० | ६.५६० | ०.००० | ०.००० | ० | १९.२८० |
| | ब) जिल्हा परिषद | ० | ० | ०.००० | ३१.१२० | १६४.७९० | १४८१.७६० | ० | १६७७.६७० |
| | क) न.पा./म.न.पा. | | | | | | | | |
| ४ | **इतर माल वापरून तयार** | | | | | | | | |
| | अ) सा.बां.विभाग | ० | ५.८९० | ०.००० | ७.९१० | ० | ० | ० | १३.८०० |
| | ब) जिल्हा परिषद | ० | ० | ० | २५.४२० | १०९.७०० | ६८६.४४० | ० | ८२१.५६० |
| | क) न.पा./म.न.पा. | | | | | | | | |
| | **एकूण लांबी** | | | | | | | | |
| | अ) सा.बां.विभाग | ११२.१९४ | १३०.४०५ | ९०४.४२५ | ७७२.३५० | ०.००० | ०.००० | ० | १९१९.३७४ |
| | ब) जिल्हा परिषद | ० | ० | ० | १६०.०६० | ११७८.१८० | ४११७.९७० | ० | ५४५६.२१० |
| | क) न.पा./म.न.पा. | | | | | | | | |
| | **जिल्हा एकूण** | ११२.१९४ | १३०.४०५ | ९०४.४२५ | ९३२.४१० | ११७८.१८० | ४११७.९७० | ० | ७३७५.५८४ |

## ठाणे बांधकाम विभाग, ठाणे
## कार्यालयाच्या अखत्यारीत ३१ मार्च २०१२ अखेर असलेली रस्ते लांबी.

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | कल्याण सा.बां.उपविभाग | -- | -- | १.६०० | ३९.३७५ | -- | -- | -- | ४०.९७५ |
| | उल्हासनगर सा.बां.उपविभाग | -- | -- | १७.१३० | ३२.०३० | -- | -- | -- | ४९.१६० |
| | मुरबाड सा.बां.उपविभाग | -- | -- | ७२.७०० | ७५.५३० | -- | -- | -- | १४८.२३० |
| | शहापूर सा.बां.उपविभाग | -- | -- | ८१.५०० | १५२.४२५ | -- | -- | -- | २३३.९२५ |
| | ठाणे बांधकाम विभाग एकूण | -- | -- | १७२.९३० | २९९.३६० | -- | -- | -- | ४७२.२९० |

# Road Development Plan 2001-2021 District Thane.

## ABSTRACT OF COST

Superintending Engineer. Thane
P.W.Circle, Thane.

परिशिष्ट- इ

| Sr. No. | No. of Roads | Name of Taluka in Marathi ( Fond DVTT Surekh only) | Length in Km. | Estimated Cost (Rs. In Lakhs) | Possible Surface of Fund | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | BOT | State Level /CRF | NABARD | PMGSY | Additional PMGSY | Dist ODR | Dist VR | Tribal |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| 1 | 334 | तलासरी | 662.855 | 23115.170 | 3452.000 | 3146.400 | 0.000 | 4894.400 | 0.000 | 0.000 | 0.000 | 11622.370 |
| 2 | 629 | डहाणू | 1528.205 | 33844.970 | 12344.000 | 1044.720 | 60.000 | 12676.650 | 0.000 | 0.000 | 5419.300 | 2300.300 |
| 3 | 241 | जव्हार | 898.470 | 19965.800 | 2770.000 | 2095.000 | 0.000 | 9132.300 | 0.000 | 0.000 | 12.000 | 5956.500 |
| 4 | 138 | मोखाडा | 543.810 | 15398.350 | 0.000 | 3344.000 | 0.000 | 5913.600 | 0.000 | 0.000 | 0.000 | 6140.750 |
| 5 | 252 | विक्रमगड | 708.460 | 19886.600 | 9276.000 | 264.000 | 0.000 | 5076.600 | 0.000 | 0.000 | 0.000 | 5270.000 |
| 6 | 540 | वाडा | 1134.744 | 38426.870 | 16484.000 | 3652.400 | 0.000 | 5793.150 | 3908.850 | 0.000 | 47.500 | 8540.970 |
| 7 | 366 | पालघर | 1133.060 | 42904.700 | 20471.200 | 6407.450 | 0.000 | 11721.450 | 133.000 | 0.000 | 2807.600 | 1364.000 |
| 8 | 588 | शहापूर | 1600.070 | 52020.050 | 21156.000 | 4971.000 | 0.000 | 9012.500 | 4511.500 | 40.000 | 6961.500 | 5367.550 |
| 9 | 413 | भिवंडी | 880.136 | 26076.670 | 12107.800 | 979.910 | 325.710 | 9070.500 | 698.000 | 752.500 | 2797.250 | 1325.000 |
| 10 | 399 | वसई | 643.050 | 22552.860 | 11056.000 | 2770.000 | 0.000 | 7337.350 | 96.000 | 137.500 | 546.510 | 609.500 |
| 11 | 19 | ठाणे | 173.798 | 54037.000 | 53877.000 | 160.000 | 0.000 | 0.000 | 0.000 | 0.000 | 0.000 | 0.000 |
| 12 | 214 | कल्याण | 527.104 | 9081.150 | 0.000 | 848.600 | 0.000 | 3199.900 | 0.000 | 68.500 | 4964.150 | 0.000 |
| 13 | 3 | उल्हासनगर | 6.250 | 0.000 | 0.000 | 0.000 | 0.000 | 0.000 | 0.000 | 0.000 | 0.000 | 0.000 |
| 14 | 176 | अंबरनाथ | 416.855 | 5509.650 | 900.000 | 1056.000 | 0.000 | 1242.000 | 0.000 | 0.000 | 2311.650 | 0.000 |
| 15 | 335 | मुरबाड | 956.715 | 15849.450 | 0.000 | 2636.800 | 765.600 | 5650.000 | 1748.500 | 0.000 | 2693.750 | 2354.800 |
| | | | 11813.582 | 378669.290 | 163894.000 | 33376.280 | 1151.310 | 90720.400 | 11095.850 | 998.500 | 28561.210 | 50851.740 |

Thane P.W.Circle, Thane (THANE DIST)

## ROAD DEVELOPMENT PLAN 2001-2021 ( THANE DISTRICT )
## FUND HEAD WISE DISTRIBUTION ABSTRACT

परिशिष्ट- इ

| Sr. No. | Category of road 2001-201 | (1) Missing | (2) Murmi | (3) WBM | (4) B.T. | (4) Bridges | Total Length in Km. | Estimated Cost (Rs. In Lakhs) | Possible Surface of Fund | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | BOT | State Level /CRF | NABARD | PMGSY | Additional PMGSY | Dist ODR | Dist VR | Tribal | Total |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| | N.H. | 0.000 | 0.000 | 0.000 | 316.304 | 102 | 316.304 | 0.000 | 0.000 | 0.000 | 0.000 | 0.000 | 0.000 | 0.000 | 0.000 | 0.000 | 0.000 |
| | EW | 194.337 | 0.000 | 0.000 | 17.81 | 27 | 212.147 | 90745.000 | 90745.000 | 0.000 | 0.000 | 0.000 | 0.000 | 0.000 | 0.000 | 0.000 | 90745.000 |
| | MSH | 8.710 | 0.000 | 0.000 | 169.755 | 16 | 178.465 | 41937.520 | 41586.800 | 350.720 | 0.000 | 0.000 | 0.000 | 0.000 | 0.000 | 0.000 | 41937.520 |
| | SH | 14.600 | 0.000 | 12.720 | 1198.365 | 132 | 1225.685 | 49606.910 | 30162.200 | 19444.710 | 0.000 | 0.000 | 0.000 | 0.000 | 0.000 | 0.000 | 49606.910 |
| | MDR | 152.730 | 13.600 | 39.240 | 1030.558 | 73 | 1236.128 | 31266.310 | 0.000 | 16328.850 | 1151.310 | 0.000 | 0.000 | 0.000 | 0.000 | 13786.150 | 31266.310 |
| | ODR | 146.800 | 16.740 | 195.070 | 1491.110 | 49 | 1849.720 | 33719.750 | 0.000 | 0.000 | 0.000 | 28465.750 | 824.000 | 998.500 | 0.000 | 3431.500 | 33719.750 |
| | VR | 1651.020 | 550.160 | 2000.110 | 2593.843 | 128 | 6795.133 | 131393.800 | 0.000 | 0.000 | 0.000 | 60274.650 | 10271.850 | 0.000 | 28561.210 | 32286.090 | 131393.800 |
| | Total | 2168.197 | 580.500 | 2247.140 | 6817.745 | 527 | 11813.582 | 378669.290 | 162494.000 | 36124.280 | 1151.310 | 88740.400 | 11095.850 | 998.500 | 28561.210 | 49503.740 | 378669.290 |